# जिल्हा परिषद, औरंगाबाद
## जाहीर प्रकटन

## सरळसेवा भरती २०१९ व २०२१ चे परिक्षा शुल्क परत करणे

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.११ (भाग-१)/आस्था-८ दि.०६/०९/२०२३ अन्वये माहे मार्च २०१९ व माहे ऑगस्ट,२०२१ ( अपंग व इतर सुधारीत आरक्षणासह ) महाभरती अंतर्गत अर्ज करण्यात आलेल्या उमेदवरांना परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित उमेदवरांना परत करण्याबाबत कळविण्यात आले आहे .

त्या अनुषंगाने जिल्हा परिषद, औरंगाबाद च्या आस्थापनेवरील सन २०१९ मधील जाहीरातीत नमूद गट-क १८ संवर्गामधील रिक्त पदे व ऑगस्ट -२०२१ मधील जाहिरातीत नमूद गट -क मधील आरोग्य विभागातील ५ संवर्गातील सरळसेवेने पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

शासन निर्णय दिनांक २१.१०.२०२२ मधील निर्णयान्वये सदर भरती प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. उपरोक्त परिक्षाकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांना त्यांचे परिक्षा शुल्क परत करण्याच्या अनुषंगाने **https://maharddzp.com** या संकेत स्थळावर लिंक उमेदवारांसाठी दि.०५/०९/२०२३ पासून सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१९ व सन २०२१ च्या भरती प्रक्रियेत ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केलेले आहेत, अशा उमेदवारांनी आवश्यक बँक खाते क्रमांक व इतर तपशिलासह उपरोक्त लिंकद्वारे माहिती भरावी. तदनंतर प्राप्त माहितीची पडताळणी करुन संबंधितांच्या बँक खात्यावर रकमेचे प्रदान करण्यात येईल.

दिनांक - ०७/०९/२०२३
स्थळ - औरंगाबाद

स्वाक्षरित /-
( सुदर्शन तुपे )
उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( सा.प्र )
जिल्हा परिषद औरंगाबाद

स्वाक्षरित /-
( विकास मीना ) भा.प्र.से
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद औरंगाबाद